मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

संपादक : तुषार गायकवाड

कार्यकारी संपादिका रुबिना मुल्ला :9890879757

RNI No. MAHMAR/2016/72543

वर्ष ६वे | अंक : ०५ | रविवार,दि.०५ मे ते शनिवार ११ मे २०२४ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४



पान २ संपादकीय महाराष्ट्राचे महामंथन...

पान ३ मासिक पाळीची सुटी...

पान ४ नालासोपारा द्वारका हॉटेल..


## वाढवणला आधीही विरोध होता आजही आहे व पुढेही राहील- हितेंद्र ठाकूर

पालघर - वाढवण बंदर हा झाई पासून थेट उत्तन पर्यंतच्या आपल्या मच्छीमारांच्या पोटावर पाय आणणारा प्रकल्प आहे. वाढवण बंदरा संदर्भात ज्यावेळी पालकमंत्र्यांनी बैठक घेतली होती. त्यावेळी जेएनपीटीचे एमडी सेठी म्हणून आले होते. त्यावेळी त्या बैठकीत खासदार होते विधानसभेचे व विधान परिषदेचे आमदार असताना सुद्धा त्यावेळी एकमेव पक्ष होता ज्याने वाढवण बंदर नको म्हणून त्यावेळी त्या बैठकीत सांगितले होते. त्यावेळी निवडणूक घोषित सुद्धा झाली नव्हती त्यावेळी वाढवणला विरोध करणारा बहुजन विकास आघाडी हा एकमेव पक्ष होता. हा विरोध आधी ही होता आजही आहे व पुढेही राहील असे वक्तव्य बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर यांनी पत्रकारांशी पालघर येथे बोलताना केले.बहुजन विकास आघाडीचे पालघर लोकसभेचे उमेदवार राजेश पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी



आमदार हितेंद्र ठाकूर पालघर येथे आले होते. त्यावेळी ते पत्रकाराशी बोलत होते. उमेदवारीचा अर्ज राजेश पाटील यांनी पहिल्याच दिवशी भरला होता. दुसरा अर्ज असावा काही अर्जात चूक झाली तर त्या दृष्टीने सर्व कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव आज अर्ज भरत आहोत. आजची रॅली ही विजयावर शिक्कामोर्तब करणारी रॅली आहे. असेही ठाकूर यांनी यावेळी सांगितले.गावितांचे तिकीट कापण्यात आले. या विषयावर ठाकूर यांना छेडले असता त्यांनी गावितांचे तिकीट कापण्यास राजेश पाटील कारणीभूत आहेत. कारण काही लोकांचे सर्वे वारंवार चालू असतात त्यात राजेश पाटील यांच्यासमोर कोणाचा टिकाव लागणार नाही. हे माहिती झाल्यामुळे त्यांचे तिकीट कट झाले त्यांचे कर्तृत्व तुम्हाला माहित आहे त्याच्यावर मी काही बोलणार नाही असा टोलाही ठाकूर यांनी गावीताना लगावला.जिल्ह्याचे पहिले खासदार बळीराम जाधव यांनी उपनगरीय लोकल सेवेला हिरवा झेंडा दाखवला. पालघरच्या समोर असलेल्या बॉम्बे हाय येथून आपल्याला गॅस मिळावा हा आग्रह धरला. आज अर्ध्या जिल्ह्यात पाईप द्वारे गॅस पोहचला आहे. उर्वरित जिल्ह्यात लवकरच गॅस येणार आहे. त्याच बरोबरीने औद्योगिक क्षेत्रात गॅस कसा मिळेल जेणेकरून कारखान्यांची संख्या आपल्याकडे वाढेल व त्यामुळे रोजगार निर्माण होतील यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.

## लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

### छाननी अंती १३ उमेदवारांचे २१ नामनिर्देशनपत्र पात्र तर ४ उमेदवारांचे ५ नामनिर्देशनपत्र अपात्र




पालघर दि. ४ मे : २२ - पालघर (अ.ज.) लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २६ नामनिर्देशनपत्र दाखल केले. त्याची छाननी आज करण्यात आली. त्यानुसार १३ उमेदवारांचे २१ नामनिर्देशनपत्र पात्र तर ४ उमेदवारांचे ५ नामनिर्देशनपत्र अपात्र ठरविण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत छाननी प्रक्रिया करण्यात आली. यावेळी जिल्हा निवडणूक निणय अधिकारी गोविंद बोडके, जनरल ऑब्झरवर अजयसिंह तोमर, अप्पर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अपर्णा सोमाणी, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) संजिव जाधवर, तहसीलदार सचिन भालेराव आदी उपस्थित होते.

छाननी अंती सुरेश गणेश जाधव (अपक्ष), परेश सुकूर घाटाळ (अपक्ष) २ अर्ज, राजेश दत्तू उमतोल (अपक्ष), भावना किसन पवार (अपक्ष) यांचे अर्ज अपात्र ठरविण्यात आले. तर बळीराम सुकूर जाधव (बहुजन विकास आघाडी) यांनी अर्ज मागे घेतला.

## नाराज खासदार राजेंद्र गावित प्रचारापासून लांबच, वसईत हेमंत सावरा यांचा प्रचार सुरू

### पालघर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी डावललेलेखासदार राजेंद्र गावित कमालिचे नाराज असून त्यांनी प्रचारापासून दूर राहणेच पसंद केले आहे.

वसई - पालघर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी डावललेले खासदार राजेंद्र गावित कमालिचे नाराज असून त्यांनी प्रचारापासून दूर राहणेच पसंद केले आहे. त्यामुळे रविवारी वसई विरारमध्ये गावित यांच्याशिवाय महायुतीचे उमेदावर हेमंत सावरा यांनी प्रचार सुरू केला आहे. गावित प्रचारात नसले तरी शिवसेना गटाचे पदाधिकारी मात्र प्रचारात उतरले आहेत.रविवार हा प्रचाराचा महत्वाचा दिवस असल्याने सर्वच पक्षांनी आज भरगच्च



प्रचाराचा कार्यक्रम आखला आहे. रविवारी महायुतीचे उमेदवार हेमंत सावरा यांचा प्रचारदौरा वसई विरार शहरात सुरू झाला आहे. विरारच्या जीवदानी मंदिरात आशिर्वाद घेऊन सावरा यांना प्रचाराला प्रारंभ केला. यावेळी पालकमंत्री रवींद्र चव्हाण उपस्थित होते. पालघर लोकसभा मतदारसंघातून ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने विद्यमान खासदार राजेंद्र गावित यांची नाराजी अद्याप कायम आहे.राजेंद्र गावित यांनी सावरा यांच्या प्रचाराकडे पाठ फिरवली आहे. संध्याकाळी वसईत महायुतीची जाहीर सभा असून

# संपादकीय...!

## महाराष्ट्राचे महामंथन

मराठी भाषेला 'अभिजात भाषे'चा दर्जा देण्याच्या मागणीकडे केंद्र सरकार ढुंकूनही पाहात नाही. महाराष्ट्र देशाला ४८ खासदार देतो. उत्तर प्रदेशाच्या खालोखाल हा आकडा आहे. तरीही, महाराष्ट्राचे दिल्लीत किती वजन आहे, हे 'अभिजात'च्या मागणीला ज्या वाटाण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत, त्यावरून लक्षात यावे.

महाराष्ट्र दिन' काल, बुधवारी उत्साहात साजरा झाला. महाराष्ट्र या राज्याचा जन्म एक मे १९६०चा. म्हणजे, ६४ वर्षे पुरी झाली. सध्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार चालू आहे. ही झाली की विधानसभेची निवडणूक येईल. प्रचारात जी भाषा वापरायची असते, जी आश्वासने द्यायची असतात आणि जी स्वप्ने विकायची असतात; ते काम सध्या चालू आहे. ते पुढेही चालू राहील. मात्र, भारत स्वतंत्र होऊन झालेली ७७ वर्षे आणि संयुक्त महाराष्ट्र होऊन झालेली ६४ वर्षे हा कालावधी छोटा नाही. इतक्या काळात जगातील अनेक देशांनी एकाच झेपेत नवे राष्ट्र घडवून दाखविले आहे. जपान, क्युबा, सिंगापूर, दक्षिण कोरिया यांच्यासहित अनेक देशांची उदाहरणे या संदर्भात देता येतील. महाराष्ट्राला जवळपास दोन हजार वर्षांचा इतिहास आहे. मराठी या भाषेला सलग किमान दीड हजार वर्षांचा इतिहास आहे. तसे पुरावे आणि सामग्री केंद्र सरकारला अनेकवार सादर करण्यात आली आहे. मात्र, हा पुरावा असूनही मराठी भाषेला 'अभिजात भाषे'चा दर्जा देण्याच्या मागणीकडे केंद्र सरकार ढुंकूनही पाहात नाही. महाराष्ट्र देशाला ४८ खासदार देतो. उत्तर प्रदेशाच्या खालोखाल हा आकडा आहे. तरीही, महाराष्ट्राचे दिल्लीत किती वजन आहे, हे 'अभिजात'च्या मागणीला ज्या वाटाण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत, त्यावरून लक्षात यावे.महाराष्ट्राला मिळणारी ही दुय्यम वागणूक केवळ मराठीच्या 'अभिजात' या दर्जापुरती नाही. तसेच, या दुय्यमपणाचे आविष्कार केवळ सरकारी पातळीवर होतात, असेही नाही. ते सर्वच पातळ्यांवर प्रकट किंवा सुप्त रूपात होत असतात. मात्र, याचा दोष इतर कुणाचा नसून महाराष्ट्राचा स्वतःचा आणि स्वतःला आधुनिक, उद्यमी आणि स्वयंभू समजणाऱ्या मराठी माणसांचा आहे. गेल्या काही वर्षांत 'महाराष्ट्र गौरवा'ची कंठाळी गीते वाजविण्याची आणि ऐकण्याची इतकी भ्रामक, मांद्यमूलक सवय आपण लावून घेतली आहे की, महाराष्ट्राचे यथातथ्य चित्र समजावून घेण्याची आणि कठोर आत्मपरीक्षण करण्याची क्षमताच आपण गमावतो आहोत. भारताचे चित्र पाहिले तर दक्षिणेतील विकासाच्या सर्व निकषांमध्ये पुढे गेलेली तमिळनाडू, केरळसारखी राज्ये; तर दुसरीकडे उत्तरेला बहुतेक निकषांमध्ये मागे असणारी राज्ये. महाराष्ट्राचा उल्लेख अभ्यासक 'कल्चरल कॉरिडॉर' असा करीत आले आहेत. याचा अर्थ, महाराष्ट्राच्या संस्कृतीने, लोकजीवनाने दक्षिण व उत्तर यांचे संगमस्थळ म्हणून अनेक शतके आपले स्थान टिकविले, फुलविले. मात्र, गेल्या काही दशकांमध्ये महाराष्ट्राने आपला चेहरामोहरा उत्तरगामी ठेवला असून दक्षिणेचे काही चांगले गुण त्यागून बकाल, असंस्कृत, गबाळग्रंथी आणि आकांक्षाशून्य होण्याचा जणू चंग बांधला आहे. देशात आघाडीवर दिसणारे महाराष्ट्राचे अर्थचित्र म्हणजे मुंबईसहित मोजक्याच जिल्ह्यांची देणगी असून उर्वरित बहुतांश महाराष्ट्र हा गरिबी, सुशिक्षितांची बेरोजगारी, पाण्याचे दुर्भिक्ष्य, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मातृभाषेची चौफेर पीछेहाट, शालेय व उच्च शिक्षणाची ससेहोलपट, हिंस्र जातीयता, सामाजिक अनुदारता यांनी पुरता ग्रासलेला आहे.निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'मटा जाहीरनामा' या उपक्रमात 'महाराष्ट्र टाइम्स' जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील जाणकारांना बोलते करीत आहे. वैद्यकीय, न्याय, अर्थ, मनोरंजन, शिक्षण, सामाजिक वाटचाल यासहित एकाही क्षेत्रातील महाराष्ट्राची वाटचाल समाधानकारक नाही, हेच या चर्चांमधून अधोरेखित होते आहे. ही स्थिती चिंताजनक आहे. गौरवशाली इतिहास असणाऱ्या, दिल्लीची बादशाही ताब्यात ठेवणाऱ्या, स्वातंत्र्य चळवळीत अग्रभागी असणाऱ्या आणि दिल्लीश्वरांना हट्ट सोडायला लावून मराठी राज्य साकारणाऱ्या मराठी माणसाची आणि महाराष्ट्राची आज इतकी दुरवस्था का झाली आहे; या प्रश्नाचे उत्तर शोधल्याशिवाय पुढचा प्रवास करता येणार नाही. 'नगरसेवक इतकीच ज्यांची पात्रता; ते संसदेच्या दारात उभे आहेत...' अशी टीका केवळ राजकीय नेत्यांवर करून भागणार नाही. सर्व क्षेत्रांत हीच अवस्था आहे. राष्ट्रीय पातळीवर कोणत्याही विषयातील अजेंडा ठरविण्यात, तडफदार नेतृत्व करण्यात, देशाला दिशा देण्यात आज मराठी माणूस कुठे आहे? महात्मा गांधी महाराष्ट्राला 'कार्यकर्त्यांचे मोहोळ' असे म्हणत. ते आजही कदाचित खरे असेल. पण हे सर्वच क्षेत्रातील कार्यकर्ते स्वतः नेतृत्व देण्याऐवजी इतरांच्याच पालख्या उचलण्यात किंवा नाचविण्यात मग्न आहेत की काय? संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर सन १९६२मध्ये या चळवळीत अग्रभागी असणारे लालजी पेंडसे यांनी 'महाराष्ट्राचे महामंथन' हा ग्रंथ लिहिला होता. या चळवळीचे ताणे-बाणे उलगडणाऱ्या या ग्रंथातून महाराष्ट्राचे लढाऊ व्यक्तिमत्त्वही आकळते. आज चाललेला दिखाऊ नाचरेपणा व जल्लोष करण्याऐवजी नव्याने 'महाराष्ट्राचे महामंथन' व्हायला हवे. ते झाले तर सध्याच्या खाईतून बाहेर येण्याची तिरीप दिसू शकेल.

## वाढवणला आधीही विरोध... पान नं. १ वरुन

बळीराम जाधव यांच्या कारकीर्दीत डहाणू नाशिक रेल्वेचा सर्वे झाला होता. त्यानंतर त्याबाबत कोणीही लक्ष दिले नाही त्या कामाला गती देण्याचे काम ही आम्ही करणार आहोत. असेही ठाकूर यांनी यावेळी सांगितले.विण्यात आले. तर बळीराम सुकूर जाधव (बहुजन विकास आघाडी) यांनी अर्ज मागे घेतला.

## नाराज खासदार राजेंद्र गावित... पान नं.१वरुन

त्याला देखील ते उपस्थित राहणार नाहीत. 'माझ्यावर अन्याय झालेला आहे. त्यामुळे सध्या तरी मी प्रचारात नाही असे गावित यांनी सांगितले. मतदारसंघाता काही दिवसांपूर्वी मी माझ्यासाठी मते मागत होतो आणि आता माझ्याऐवजी दुसयाला मते द्या असे सांगणे मला जड जात आहे', असे गावित यांनी सांगितले. संध्याकाळी मला दुसऱ्या कामाला जायचे असल्याने मी प्रचार सभेला उपस्थित राहणार नाही, असेही ते म्हणाले.शिवेसेना (शिंदे गट) पदाधिकारी मात्र प्रचारास सहभागी

शिंदे गटाचे खासदार प्रचारात नसले तरी शिंदे गटाचे पदाधिकारी प्रचारात सहभागी झाले आहेत. आम्ही सकाळपासून प्रचारात आहोत. महायुतीचे उमेदवार हेमंत सावरा यांना आम्ही विजयी करू, असे शिवेसना (शिंदे गट) जिल्हाध्यक्ष निलेश तेंडोलकर यांनी सांगितले. आमचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते प्रचारात सक्रीय आहेत. पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी देखील गावित यांची भेट घेतली आहे. त्यांना मान सन्मान दिला जात आहे. खासदार गावित यांचे योग्य ते पुर्नवसन केले जाईल असेही तेंडोलकर यांनी सांगितले.गावितांची नाराजी दूर होईल- भाजपाला विश्वास

पद न मिळाल्यास कार्यकर्ता नाराज होतो. गावितांची खासदारकीची उमेदवारी डावल्याने ते नाराज होणे स्वाभाविक आहे. परंतु आम्ही त्यांची नाराजी दूर करू आणि ते प्रचारास सहभागी होतील, असे भाजपाचे प्रसिध्द प्रमुख आणि उपजिल्हाध्यक्ष मनोज बारोट यांनी सांगितले.

## मासिक पाळीची सुटी ते......पान नं. ३वरुन

कोणी दाद घेतली नाही.सरकारची मदत पोहचली नाही. कितीही मृतदेह झाले या पाण्यात त्यांच्याकडे एकदाही शासनाने मदत दिलेली नाही. मच्छी विकली नाही गेली तर टेंशन येतं आम्हाला पैसे ज्यांच्याकडून घेतले आहे ते परत तर द्यावेच लागतात. दलाल लोक मध्ये असतात. त्यात मासे हा नाशवंत माल आहे. यामुळे हा धोका कायम राहतो.'कापड गिरणी महिला कामगारः 'रोज आठ तास उभं राहून काम करतो किमान मासिक पाळीत पगारी सुटी पाहिजे'

रत्नागिरी जिल्ह्यातून आम्ही पोहोचलो कोल्हापूर जिल्ह्यात. कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी शहर हे 'मँचेस्टर ऑफ महाराष्ट्र' म्हणून ओळखलं जातं. कारण इचलकरंजी हे कापड तयार करण्याचं आणि निर्यातीचं देशातील एक महत्त्वाचं केंद्र आहे.भारत हा कापड निर्यात करणारा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. इतकंच नाही तर, वस्त्रोद्योग हा रोजगार निर्मितीतही देशात आघाडीवर आहे. शेतीनंतर रोजगार निर्मितीत वस्त्रोद्योग दुसऱ्या क्रमांकावर आहे.यात इचलकरंजीतील टेक्स्टाईल इंडस्ट्रीचा मोठा वाटा आहे. परंतु इचलकरंजीतील वस्त्रोद्योग आज अडचणीत आहे अशी तक्रार पॉवरलूमचे कामगार, सदस्य आणि मालकांकडूनही केली जात आहे.

अनेक कापड गिरण्या बंद पडल्या असून हातमाग तर ठप्प असल्याचं चित्र आहे. इचलकरंजीतील कापड गिरण्यांमध्ये महिला मोठ्या संख्येने काम करत आहेत.कापड तयार करण्याच्या प्रक्रियेत सुरुवातीला कापसापासून धागा तयार केला जातो. स्पिनिंग मिलमध्ये कापूस आणि त्यापासून बारीक धागा तयार करण्याचं काम केलं जातं. यानंतर हा धागा सायझिंग मिलमध्ये जातो.

लूमवर चालण्यासाठी धाग्यावर केमिकल लावलं जातं, धागा गुंडाळला जातो किंवा कापड बनवण्यायोग्य बनवला जातो असंही म्हणता येईल. या सर्व प्रक्रियांमध्ये महिला आघाडीवर काम करतात. तर कापड तयार केल्यानंतर गारमेंट इंडस्ट्रीतही शिलाईकामासाठी महिलांची संख्या मोठी आहे.आम्ही इचलकरंजीत पोहचल्यानंतर एका स्पिनिंग मिलमध्ये काम पाहाण्यासाठी गेलो. थेट शेतातून आलेल्या कापसाच्या गोण्या आणि त्यापासून दोरा बनवण्याचं काम अनेक यंत्रांद्वारे सुरू होतं. आणि यंत्रांवर काम करणाऱ्या महिला कामगारांना आम्ही भेटलो.यापैकी अनेक महिला दहा ते पंधरा वर्षांपासून अधिक काळापासून काम करत आहेत. स्पिनिंग मिलमध्ये काम करताना महिलांना सलग आठ ते नऊ तास उभं राहून काम करावं लागतं. तसंच एवढ्या वर्षांपासून काम करत असल्याने आणि दिवसभर कापसात काम असल्याने महिलांच्या नाका-तोंडात कापूस गेल्याचं त्या सांगतात.एका महिलेने सांगितलं, 'घरात मदत करण्यासाठी मी हे काम शिकले. पहाटे उठून घरातलं सगळं आवरून, स्वयंपाक करून मी आठ वाजता मीलवर पोहचते आणि संध्याकाळी चार वाजता सुटते. मग घरी गेल्यावर परत घरातलं काम यात खूप हाल होतात. थकवा येतो. पण कोणाला सांगणार. महिलांना घर आणि बाहेर दोन्हीकडे काम करावं लागतं. पुरुषांचं मात्र तसं नसतं. पण याचा मोबदला मात्र महिलांना मिळत नाही.'

त्या पुढे सांगतात, 'मासिक पाळीत खूप त्रास होतो. काही महिलांच्या अंगावरचं खूप जातं पण इलाज नसतो कामावर यावंच लागतं. मी तर काही काही महिलांना बाथरूममध्ये रडताना पाहिलं आहे. त्यात आम्ही एवढे तास उभं राहून काम करतो.मासिक पाळीत असह्य वेदना होतात. मला वाटतं मासिक पाळीत तर समद्या महिलांसाठी सरकारने राष्ट्रीय सुट्टी जाहीर करावी. जशा बाकीच्या राष्ट्रीय सुट्या असतात ना तशी. त्याचा पगार सुद्धा महिलांना द्यावा तरच आराम मिळेल महिलांना.'आणखी एका महिलने सांगितलं, 'एवढ्या वर्षांपासून कापूस आमच्या पोटात जातोय. आम्हाला काय होईल ही भीती सतत राहते. नाका-तोंडातून कापसाचे कण जातात, त्यामुळे भविष्यात आम्हाला काही आजार झाला तर त्यासाठी काही आरोग्य योजना असावी.कापड गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या महिलांचा विचार व्हावा. कुठलाच विमा नाही आमच्यासाठी. जर काम करताना आम्हाला काही झालं तर त्यासाठी सरकारी विमा असावा.'या महिलांना भेटल्यानंतर आम्ही गारमेंटमध्ये काम करणाऱ्या महिलांशी संवाद साधण्यासाठी पोहचलो. तिथे हजारोंच्या संख्येने शिलाई मशीन्सवर महिला काम करत होत्या. पांढऱ्या कापडापासून शर्ट शिलाईचं काम त्यावेळी सुरू होतं.महिलांनी सांगितलं महागाईने आमचं कंबरडं मोडलं आहे. घरात आई-वडील दोघं आम्ही काम करतोय मग ती मोलमजुरी का असेना पण तरीही पैसे पुरत नाहीत. सिलिंडर, भाज्या, धान्य सगळंच इतकं महाग आहे की महिन्याचा खर्च निघत नाही. त्यात उच्च शिक्षण आम्हाला परवडत नाही, मुलं शिकली नाहीत तर त्यांनीही पुढे आमच्यासारखी मजुरीचं करायची का? असाही प्रश्न महिला करतात.''सरकारची घरकुल योजना आहे. पण प्रत्यक्षात ती मंजूरच होत नाही. कितीही कागदपत्र दिली तरी घरकुल काही मिळत नाही. मग कशाला सरकार जाहिराती करतं की योजना दिली म्हणून. आम्हाला तर काही मिळत नाही.' असंही एका महिलेने सांगितलं.त्या पुढे सांगतात, 'इचलकरंजीतील कापड गिरण्या बंद होतायत. बाकी राज्यांमध्ये सरकार पाठबळ देतं अशा उद्योगांना. इथल्या गिरण्यांकडेही सरकारने लक्ष द्यावं. कापड गिरण्या राहिल्या तर आमच्या नोकऱ्या राहतील.'विडी कामगार महिलाः टीबी, कॅन्सर होण्याचा धोका तरीही आरोग्याची एक सुविधा नाही'

इचलकरंजीतून आम्ही विडी कामगार महिलांना भेटण्यासाठी सोलापूरमध्ये गेलो. सोलापूर जिल्ह्यात विडी (बिडी) तयार करणाऱ्याचं काम मोठ्या प्रमाणात चालतं.सोलापुरात विडीचे कारखाने आहेत. विडी वळण्याचं काम प्रामुख्याने महिलाच करताना दिसतात. पूर्वी कापड गिरण्या बंद पडल्यानंतर विडीच्या कामाला सोलापुरात गती आली आणि मग अगदी घरोघरी हे काम महिला करू लागल्या असं चित्र आहेत.सोलापूर शहराजवळ विडी कामगारांच्या अनेक वसाहती आहेत. इथे घरातील एकपेक्षा जास्त महिला विडीचं काम करतात. सकाळी कारखान्यातून वजन करून तंबाखू आणि तेंदूची पानं आणायची आणि मग घरी दिवसभर विडी तयार करायची.तेंदू पत्ता घरी आणल्यावर पाण्यात भीजवून सुकवायचा आणि मग तंबाखू टाकून, दोरीने बांधून विड्या तयार करायच्या. साधारण दिवासा एक हजार विड्या महिलांनी बनवाव्या असं त्यांना सांगितलं जातं. यानुसारच त्यांना कारखान्यातून मोबदला मिळतो.आम्ही अशाच एका कारखान्यात पोहचलो. महिला आपल्या पिशव्यांमध्ये तेंदूची पानं आणि तंबाखू भरत होत्या. वजनकाट्यावर त्यांना ही पानं दिली जात होतं. त्याचं मोजमाप वहीत लिहून घेतलं जातं. प्रत्येक पानाचा हिशेब कारखान्यात नोंदवला जातो.

# मासिक पाळीची सुटी ते पुरुषांच्या बरोबरीने वेतनः काय आहे महाराष्ट्रातील महिलांचा जाहीरनामा?

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि सरकारपर्यंत महिलांचे प्रश्न पोहोचवण्यासाठी महाराष्ट्रातल्या कष्टकरी तसंच स्थानिक पातळीवर नेतृत्व करणाऱ्या महिलांचं म्हणणं जाणून घेतलं.

या महिलांनी स्वतःसाठी, कुटुंबासाठी, आपल्या समुदायासाठी काही मागण्या मांडल्या आहेत. स्वतःचा विकास करत इतरांच्याही विकासाचं स्वप्न त्या पाहात आहेत. त्याच मागण्यांचा हा जाहीरनामा.'बघतुया मी बाथरूममध्ये बसून एक एक महिला रडतीया. इथच नाही शेतात असू दे की, मिलमध्ये असू दे. भारत देशात जशा राष्ट्रीय सुट्या आहेत ना तशी सरकारनेच मासिक पाळीत महिलांना चार दिस मासिक पाळीची सुटी द्यायला हवी. महिला जिथं कष्टाचं काम करतीय तिथे पगार देऊन दोन तीन दिस का होईना मासिक पाळीसाठी राष्ट्रीय सुटी मिळायला हवी.'आपलं वयसुद्धा सांगता येत नसलेल्या पिंकी शिंदे यांनी बीबीसी मराठीशी बोलताना ही प्रतिक्रीया दिली. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील अशा अनेक महिला बीबीसी मराठीच्या 'ती'चा जाहीरनामा या महिला विशेष मुलाखतींमध्ये व्यक्त झाल्या.मासिक पाळीदरम्यान पगारी रजा असो वा पुरुषांच्या बरोबरीने कामाचा मोबदला असो, आरोग्याच्या सुविधांपासून ते शिक्षण, रोजगार, शेती, पाणी अशा अनेक मागण्या महिला करत आहेत.लोकसभा निवडणुकीसाठी सध्या देशभरात सत्ताधारी आणि विरोधी पक्ष असा सर्वच राजकीय पक्षांचा जोरदार प्रचार सुरू आहे प्रचारादरम्यान मोठ-मोठी आश्वासनं दिली जात आहेत. सर्वच राजकीय पक्षांनी जाहीरनाम्यातून अनेक आश्वासनं दिली आहेत तर सत्ताधारी केलेल्या कामांचा पाढा वाचून दाखवत आहेत. पण या सगळयात समाजाचा महत्त्वाचा घटक असलेल्या महिला दुर्लक्षित असल्याचं चित्र आहे आणि राजकीय पक्षांच्या अजेंड्यावर आजही महिलांना गांभीर्याने घेतलं जात नाही अशी राज्यभरातल्या महिलांची तक्रार आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या चिखलफेकीत आम्ही महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये महिला कामगारांशी बोललो आणि त्यांच्या समस्या, मागण्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला.विदर्भात आदिवासी महिलांशी बोलण्यासाठी आम्ही गोंदिया जिल्ह्यातील काही गावांमध्ये गेलो. तर कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे बंदरावर आम्ही मच्छिमार महिलांशी संवाद साधला. इचलकरंजीत जिथे मोठ्या संख्येने कापड गिरण्या आहेत तिथे काम करणाऱ्या महिलांशीही आम्ही चर्चा केली. तसंच सोलापूर जिल्हा जो विडी कामगारांसाठीही ओळखला जातो. तिथे घरोघरी पोहोचून आम्ही विडी तयार करणाऱ्या महिलांच्या मुलाखती घेतल्या.तर बीड जिल्ह्यात ऊसतोड महिला कामागारांच्याही मुलाखती आम्ही केल्या. महिलांसाठी आम्ही काय काय केलं किंवा करू इच्छितो अशा वल्गना करणाऱ्या राजकीय नेत्यांना महिला मतदार जाब विचारत आहेत. नेमकं महिला काय म्हणाल्या आहेत हे या लेखामधून जाणून घेऊया, आदिवासी महिलाः 'मोदीजी जाहिरातीत महिलांसाठी काय दिलं ते सांगतात, पण आमच्यापर्यंत काहीच आलेलं नाही'गोंदिया जिल्ह्यातील बोरटोला गावात आम्ही पोहचलो. इथल्या आदिवासी समाजात आजही जंगलातील रानमेवा हे उदरनिर्वाहाचं एकमेव साधन आहे.शेतीची मजुरी किंवा मनरेगाचं काम बिनभरवशाचं आणि काम मिळालंच तरी त्याची मजुरी मिळतेच असं नाही असं महिला सांगतात.इथल्या महिला पहाटे पाच किंवा सहा वाजता गावाजवळच्या जंगलात पोहचतात. दुपारी बारा वाजेपर्यंत मोहाची फुलं वेचतात आणि मग ते विक्रीसाठी बाजारात पाठवतात. मे आणि जून महिन्याच्या सीझनमध्ये याच महिला जंगलातून तेंदूपत्ता संकलन करतात. परंतु मोहाची फुलं असो वा तेंदूपत्ता आदिवासी महिलांना त्याचेही पैसे बाजारभावानुसार मिळत नसल्याची त्यांची तक्रार आहे.

तळपत्या उन्हात आम्ही जंगलात पोहोचलो त्यावेळी डोक्यावर पदर बांधून मोहाची फुलं वेचणाऱ्या महिलांशी आम्ही संवाद साधला.महिला म्हणाली, 'सरकारची एकही आदिवासी योजना आम्हाला मिळालेली नाही. आमच्या इथे सगळयात मोठी सध्याची समस्या म्हणजे आदिवासी म्हणून आमच्या मुलांना शिक्षणासाठी पात्रता प्रमाणपत्र मिळणे. यासाठी आम्ही अनेक मोर्चींना गेलो पण मुलांना व्हॅलिडिटी मिळत नाही. यामुळे आमच्या मुलांचं शिक्षणच पूर्ण होत नाही.आम्ही खूप गरीब आहोत सगळे. स्कॉलरशीप मिळाली तर कमी पैश्यांमध्ये मुलं शिक्षण पूर्ण करू शकतील. शिक्षण नाही मिळालं तर त्यांनाही आमच्यासारखं जंगलावरच अवलंबून रहावं लागेल. पण स्कॉलरशीपसाठी आदिवासी म्हणून व्हॅलिडिटीच देत नाहीत.'पहाटेपासून मोहाची फुलं वेचून झाल्यावर दुपारी साधारण बारा वाजता झाडाखाली विश्रांतीसाठी बसलेल्या एका वयस्कर आजींशी आम्ही बोललो.त्या सांगतात, 'आमचे केस पिकले पण सरकारचं काहीच आमच्यापर्यंत पोहचलं नाही. आमच्या मुलाबाळांसाठी तरी काहीतरी सोय व्हावी. आम्ही दिवसभर रानात राबतो. जनावरांचे हल्ले होतात आमच्या लोकांवर पण औषधं वेळेवर मिळत नाहीत.गावात आणि जवळपास कुठेही दवाखाना नाही. ना सरकारी डॉक्टर ना प्रायव्हेट दवाखाना. आम्हाला दवाखाना आणि डॉक्टर हवा आहे. नाहीतर काय आम्ही मरतोय तसंच.'

'आमची पोरं शिकूनही घरी बसली आहेत. त्यांच्या हाताला काही काम नाही. हेच आदिवासी आहेत का? हेच आदिवासी आहेत का? असं विचारतात,'या महिलांशी बोलल्यानंतर आम्ही गोंदिया जिल्ह्यापासून जवळपास ८० किमी लांब असलेल्या जांभळी या आदिवासी पाड्यात पोहोचलो. इथले सर्व आदिवासी पाडे जंगलाजवळ असल्याने आजूबाजूला भरपूर झाडं, तलाव, नदी आणि स्वच्छ हवा अनभवायला मिळाली. परंतु निसर्गाच्या जवळ राहणाऱ्या, निसर्गाची देखभाल करणाऱ्या आदिवासी समाजापर्यंत साध्या मूलभूत सोयीसुद्धा आजपर्यंत पोहचलेल्या नाहीत हे वास्तव आहे.

जांभळी गावात जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. दगड आणि खड्डे पार करत आम्ही या गावात पोहोचलो. सुमारे १५० आदिवासींचं हा लहानसा पाडा आहे. पक्का रस्ता तर नाही पक्की घरंही नाहीत इथे नाहीत. शेत मजुरी आणि रानमेवा ही दोनच कमाईची साधनं.आम्ही या गावात पोहचलो त्यावेळी महिला सकाळपासून वेचलेली मोहाची फुलं वाळवण्याचं काम करत होत्या. त्यामुळे अनेक महिलांशी घराच्या अंगणातच भेट झाली. शहरातून कोणीतरी आपल्या समस्या विचारण्यासाठी आलंय यावरही सुरुवातीला त्यांचा विश्वास बसत नव्हता.'नेते लोक मतदानासाठी येतात. घरकुल आणून देऊ, रस्ता आणू आणि दुनियाभरचं काही काही बोलतात पण काहीच करत नाही. मतदान झालं की झालं.सडक बनवून देऊ म्हणून भूमिपूजन केलं पण ठेकेदार कोणता होता, पुढे काय झालं काहीच माहिती नाही आम्हाला.' असं एका महिलेने सांगितलं.त्या पुढे म्हणाल्या, 'ठेकेदाराने नळ बसवले पण त्याला पाणीच नाही. आता किडे पडलेत सगळे नळांना.'जांभळी गावात एकही शाळा नाहीय. अंगणवाडी सुरू आहे जिथे सहा वर्षांपर्यंत मुलं जातात. पहिली ते चौथीपर्यंत शाळेत जाण्यासाठी सहा वर्षाच्या मुलांना तीन किलोमीटर चालत दुसऱ्या गावात जावं लागतं. गावातील अंगणवाडी सेविका आणि आशावर्कर दोघींशी आम्ही संवाद साधला.आशा वर्कर म्हणाल्या, 'इथे कुपोषण आहे. मुलं कुपोषित जन्माला येतात. महिला दिवसभर जंगलात राबतात यामुळे त्यांचं जेवणाकडे दुर्लक्ष होतं. त्यांना पुरेसा पोषण आहार मिळत नाही. सरकारकडूनही वेळेत काही येत नाही आणि पुरेसंही मध्यान्न भोजन मिळत नाही. मग बालकं कमी वजनाचीच राहातात.'विशेष म्हणजे गावात आजही एकही शौचालय नाही. शौचालयाच्या जाहिराती महिला टिव्हीवर पाहतात. 'मोदी टिव्हीवर दाखवतात घरोघरी संडास, घरकुल पण आपल्या गावी काहीच नाही. निवडून आले की परत कोणी बघायला येत नाही.गावात शाळा, शौचालय काहीच नाही. आदिवासी निधीही आमच्यापर्यंत पोहोचत नाही. या सर्व सुविधा मिळाल्या पाहिजेत. घरकुलची प्रतीक्षा करत आम्ही म्हातारे झालो. आजही आम्ही झोपडीत राहतो.'मच्छिमार महिलाः 'आम्ही आंधळी,बहीरी माणसं मतं देतो पण पुढे काहीच होत नाही'

रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे बंदर तसं लोकप्रिय ठिकाण कारण पर्यटनासाठी शहरातून मोठ्या संख्येने लोक इथे येतात.कोकणातील निसर्गरम्य वातावरण आणि दापोलीतील स्वच्छ, मोठ्या सागर किनाऱ्याचा आनंद घेण्यासाठी दापोली आणि हर्णे बंदराजवळ पर्यटकांची रेलचेल दिसतेहर्णे बंदराची आणखी एक ओळख म्हणजे इथे कोट्यवधी रुपयांचा माशांचा लिलाव होतो. हर्णे बंदरावरून मासे मुंबईला पाठवले जातात आणि तिथून गोवा, कर्नाटक, केरळ अशा अनेक राज्यांत तर विदेशातही इथल्या माशांची निर्यात केली जाते. यात मोठा सहभाग असतो तो मच्छिमार महिलांचा. या महिलांना भेटण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी आम्ही पोहचलो हर्णे बंदरावर.सकाळी आठ ते दुपारी एक वाजेपर्यंत माशांचा लिलाव आणि मासेविक्री समुद्र किनाऱ्यावर सुरू असते. पुन्हा चार ते सात-आठ वाजेपर्यंत महिला किनाऱ्यावरच मासेविक्रीला बसतात. आम्ही सकाळी साडेआठ वाजता पोहोचलो त्यावेळी महिला मच्छिमार लिलावात मासे खरेदी करत होत्या.हर्णे बंदरावर समुद्र किनाऱ्यापासून खूप आतमध्ये मासेमारी करण्यासाठी मोठ्या संख्येने बोटी आहेत. मासेमारीसाठी घरातला पुरूष या बोटींवर जातो. पण किनाऱ्यापर्यंत मासे आणि इतर सामानाची ने-आण करण्यासाठी छोट्या बोटी किंवा अगदी बैलगाड्यासुद्धा वापरल्या जातात.समुद्रकिनाऱ्यावर मासे पोहचले की त्याचा लिलाव होतो. लाखोपर्यंत हा लिलाव पोहोचतो आणि मच्छिमार महिला अगदी उत्तमरित्या आपल्याला परवडेल आणि विक्रीतून नफा होईल यादृष्टीने मासे घेतात.मग तिथेच किनाऱ्यावर पापलेट, सुरमई, खेकडा, कोळंबी, बोंबील असे अनेक मासे धुतले जातात, त्याचे काप करतात आणि विक्रीसाठी रचले जातात.बाजारात अगदी सकाळपासून मासे खरेदीसाठी गर्दी असते. या कामाच्या वेळात या महिला अत्यंत व्यग्र असतात. आपण त्यांचं काम लांबून बघत राहायचं. कारण आपल्या व्यवसायात त्या इतक्या चोख आणि प्रामाणिक असतात की लिलावादरम्यान आणि नंतर ग्राहक असताना त्या अजिबात दुसऱ्या कशालाही वेळ देत नाही.आम्ही पोहोचलो तेव्हा हीच सगळी लगबग सुरू होती. या महिलांचं सर्व काम समजून घेतल्यानंतर एक एक महिलेच्या बाजूला बसून आम्ही त्यांच्याशी संवाद साधला.त्यांचं काम उरकल्यानंतर महिलांना एकत्र केलं आणि मग एका बोटीत आम्ही त्यांच्या मुलाखतीसाठी एकत्र जमलो. या मच्छिमार महिलांसाठी सर्वात कळीचा मुद्दा आहे तो म्हणजे हर्णे बंदरावर जेट्टी करण्याचा.गेल्या तीन ते चार दशकांपासून हर्णे बंदरावर जेट्टी करण्याची मागणी सुरू आहे पण दरवेळी इथल्या मतदारांच्या हाती केवळ आश्वासन दिलं जातं. मतदान झालं की पुढे जेट्टी काही होत नाही असं महिला सांगतात.आमना केवळ मच्छीचाच व्यवसाय आहे. आमचा जेट्टीचा प्रश्न आहे. जेट्टी मिळाली तर व्यवसाय चांगला होईल, महिलांना इथे सुविधा मिळतील. सामान समुद्रात नेण्यासाठी खूप अडचणी येतात हे प्रश्न मार्गी लागतील.' असं २५ वर्षांपासून हर्णे बंदरावर मासे विक्री करणाऱ्या महिलेने बोलताना सांगितलं.त्या पुढे सांगतात, ''आम्हा महिलांना इथे संडास, लघवीला जायला जागा नसल्याची मोठी समस्या आहे. बंदरावर एकही शौचालय नाहीय. आम्ही तासंतास इथे बसतो पण शौचालयाला जाता येत नाही. तसंच पिण्याच्या पाण्याचीही कुठलीही सुविधा नाही.आम्ही घरुन पाणी भरून आणतो पण ते संपल्यावर संपूर्ण बंदरावर कुठेच पिण्याचे पाणी मिळत नाही. आम्ही दिवसभर रेतीत बसतो, पाय सतत पाण्याखाली असतात. यामुळे पायाला दुखापत होते, पाय बधीर होतो, तासनतास बसल्याने कंबर भरून येते असे अनेक त्रास उद्भवतात पण एवढ्या मोठ्या बाजारात एवढ्या वर्षांत कुठलीच सुविधा महिलांसाठी म्हणून इथे केलेली नाही.साधं छप्परही कोणी बसवलं नाही. विजेचा खांब नाही यामुळे संध्याकाळनंतर अंधारातच मासे विक्री करावी लागते. मोबाईलचा टॉर्च वापरतो.'मच्छीचा व्यवसाय करूनच आमचं घर चालतं, हा समुद्रच आमची शेती आहे आणि यावरच आमचं सगळं अवलंबून आहे असं सांगताना या महिला भावनीक होतात.

त्या पुढे म्हणाल्या, 'इलेक्शनआधी बोलतात करू करू मग मतदान झालं की त्यांचे हात वर असतात. आमच्या होड्यांना आसरा जेट्टीमुळे मिळेल. वारा आला की बोटींचे खूप हाल होतात. नेते आश्वासन देतात, नारळ फोडून जातात पण काम झालेलं नाही.आमच्या होड्यांना आसरा मिळू देत एवढीच प्रार्थना आहे. आम्ही किती मागणी केली पण सरकारने दाद घेतली नाही. इलेक्शन आलं की मतदान द्या मतदान द्या म्हणतात आणि आम्ही अंधळी,भैरी माणसं आम्ही जातो मतदानाला मग मतदान झालं की ते हात वर करतात.'मासेमारी करणाऱ्या इथल्या कुटुंबासमोर आणखी एक मोठं संकट सध्या घोंघावत आहे ते म्हणजे एलईडी लाईटच्या माध्यमातून होणारी मासेमारी.जिल्हा किंवा राज्याबाहेरच्या होड्या आणि लोक येऊन इथे एलईडीने मासेमारी करतात आणि यामुळे आमच्या पारंपरिक मासेमारीला मोठा फटका बसतोय असंही महिलांनी सांगितलं. एलईडीने मासेमारी बंद केली पाहिजे अशीही महिलांची मागणी आहे.''एलईडी सुरू झाल्यापासून हर्णे बंदराची वाट लागली. लाईट पाण्यात सोडतात आणि मच्छी लाईटमुळे अंगाजवळ येते आणि मग जाळी मारतात. माशांची गणती नाही एवढे मासे जवळ येतात. दहा-वीस किमीवरचे मासे येतात. ही आमची पारंपरिक पद्धत नाही.दहा वर्षांपासून आम्ही एलईडी बंदीची मागणी करत आहोत. वादळ आलं की भीती वाटते. वादळ आल्यावर झाडं पडली, घरं पडली

# राजेंद्र गावितांनी महाविकास आघाडीचा प्रचार करावा, भारती कामडी यांची खुली ऑफर?

## उमेदवारी न मिळाल्याने नाराज असलेले शिंदे गटाचे खासदार राजेंद्र गावित यांना ठाकरे गटाने खुली ऑफर दिली आहे.



वसई : उमेदवारी न मिळाल्याने नाराज असलेले शिंदे गटाचे खासदार राजेंद्र गावित यांना ठाकरे गटाने खुली ऑफर दिली आहे. नाराज आहात तर आम्हाला मदत आणि आमचा प्रचार असे महाविकास आघाडीच्या उमेदवार भारती कामडी यांनी जाहीरपणे सांगितले. रविवारी भारती कामडी नालासोपारामध्ये प्रचारासाठी आल्या होत्या. रविवारचा दिवस असल्याने सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. जिल्ह्यातील सर्वाधिक मतदार हे वसई विरार शहरात आहेत। त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी अशा दोन्ही पक्षांनी रविवारी वसईत प्रचारासाठी भर दिला आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार शिवसेनेच्या भारती कामडी यांनी देखील नालासोपारामध्ये रविवारी प्रचार फेरी काढली. २९ गावे महापालिकेतून वगळणार तसेच ६९ गावांचा पाणी प्रश्न सोडवणार असे आश्वासन त्यांनी दिले. महायुतीने राजेंद्र गावित यांची उमेदवारी नाकारली. त्याबद्दल विचारले असता त्यांच्या पक्षाने कुणाला उमेदवारी द्यावी हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. मात्र राजेंद्र गावित नाराज आहेत तर त्यांनी आम्हाला मदत करावी आणि आमचा प्रचार करावा असेही कामडी यांनी सांगितले. भारती कामडी यांनी गावित यांना दिलेली ही डिवचणारी ऑफर चांगलीच चांगलीच चर्चेत आहे.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राजेंद्र गावित यांनी शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश केला होता आणि ठाकरे गटाचे खासदार म्हणून निवडून आले होते. मात्र शिवसेनेतील बंडा नंतर ते शिंदे गटात गेले होते. जर गावित यांनी ठाकरे गटाची साथ सोडली नसती तर आज ते पालघर मधील महाविकास आघाडीचे उमेदवार असते असे बोलले जात आहे.

# हरवले आहे



मीरा रोड पोलीस ठाणे मिसिंग र न.१९/२०२४ मधील मिसिंग व्यक्तीने नामे राजेंद्र कुंदनलाल शर्मा वय वर्ष ८४ राहणार रूम नंबर सी/ ३०३ शालोम गार्डन सोसायटी मिरा रोड व्यवसाय -निवृत्त उंची -पाच फूट -आठ इंच ,रंग - गहू वरणीय डोळे- काळे चेहरा -उभट नाक- सरळ -पिस्ता-रंगाच्या कुर्ता पायात घडद तपकिरी रंगाचे पॅन्ट पॅरेगॉन कंपनीचे स्लीपर भाषा हिंदी शिक्षण पदवी त्यांच्या हार्ट वर वर लावले फेस मेकर मशीन

दिनांक २/५/२०२४ रोजी संध्याकाळी ०६,०० वाजता नेहमीप्रमाणे महानगरपालिकेच्या गार्डन जवळील शंकराच्या मंदिर मंदिरामध्ये गेले होते परंतु ते मंदिरातून घरी परत आले नाहीत म्हणून त्याचा आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत म्हणून त्याचा शोध आपल्या पोस्टे हद्दीत घेण्यास विनंती आहे. सदर मिसिंग इस्माबाबत काही माहिती मिळाल्यास मीरारोड पोलीस ठाणे मो हद.०८६५७९ ३६९४७

पोलीस उपनिरीक्षक किरण वंजारी मो. नं.८९२८७२९०४९

पोह सोनावणे मो. नं. ९९२०५ ५५१९६ यावर सम्पर्क साधनेस विनंती आहे






# नालासोपारा द्वारका हॉटेल आग प्रकरण : ४ दिवसांनी ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल

## नालासोपारामधील द्वारका रुग्णालयाला लागेलल्या आगीप्रकरणी अखेर ४ दिवसांनी आचोळे पोलिसांनी ठेकेदारावर गुन्हा दाखल केला आहे.



मंगळवार ३० एप्रिल रोजी नालासोपारा पूर्वेच्या आचोळे येथील द्वारका हॉटेलला आग लागली होती. या आगीत सिलेंडरचा स्फोट होऊन हॉटेल जळून खाक झाले होते. तर हॉटेलमधील कर्मचारी आणि ग्राहक मिळून ८ जण जखमी झाले होते. या हॉटेलच्या समोरील रस्त्यावर गटारीसाठी खोदकाम सुरू होते. मात्र ते काम चुकीच्या पद्धतीने सुरू होते. मंगळवारी साडेतीनच्या सुमारास काम सुरू असताना जेसीबीने रस्ता खणताना गॅसपाईपलाईन फुटली आणि हॉटेलमध्ये आग लागली होती. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी जेसीबीचालक, रस्त्याचे काम करणारा ठेकेदार यांच्या विरोधात हलगर्जीपणे काम करून मानवी जीवास धोका उत्पन्न केल्याचा ठपका ठेवला आहे.या प्रकरणाची प्राथमिक चौकशी पूर्ण झाल्यानंतर आचोळे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मंगेश वडणे यांनी फिर्याद दाखल केली. या फिर्यादीनुसार ठेकेदार, जेसीबीचा चालक यांच्यासह अन्य जणांविरोधात कलम २८५, ३३६, ३३७, ३३८, ४२७ सह भारतीय वीज नियामक अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.विशेष म्हणजे, गटारीचे काम योग्य पद्धतीने होत नसून यामुळे परिसरातील इमारतींना धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा आचोळे पोलिसांनी दुर्घटनेच्या काही दिवसांपूर्वीच दिला होता.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन तुषार पब्लिकेशन में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.com